महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषद, मुंबई
Maharashtra Council of Acupuncture
202, 2nd Floor, Administrative/ Superintendent office Bldg,
Cama and Albless Hospital, Mahapalika Marg, Mumbai 400 001
Tel.: 022-22620376 | Email : mahacucouncil@gmail.com | Web : www.mahacucouncil.org

जा.क्र. मॲप/ परिपत्रक/ HPR-HFR/ॲक्यू.समावेश/ ६३६ /२०२६ दिनांक : ०७/०८/२०२६

# परिपत्रक

प्रति,
महाराष्ट्र अक्यूपंक्चर परिषदेकडे नोंदणीकृत सर्व अक्यूपंक्चर व्यवसायिक.

**विषय** : आयुष्मान भारत डिजिटल मिशन (ABDM) अंतर्गत हेल्थ प्रोफेशनल रजिस्ट्री (HPR) मध्ये महाराष्ट्र ॲक्यूपंक्चर परिषदेकडे नोंदणीकृत ॲक्यूपंक्चर व्यवसायिकांच्या नोंदणीबाबत.

**संदर्भ** : भारत सरकार - Health Professional Registry (HPR) व Health Facility Registry (HFR) पोर्टल.

महाराष्ट्र ॲक्यूपंक्चर परिषदेकडे नोंदणीकृत सर्व ॲक्यूपंक्चर व्यवसायिकांना याद्वारे कळविण्यात येते की, भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयामार्फत आयुष्मान भारत डिजिटल मिशन (ABDM) अंतर्गत डॉक्टर, वैद्यकीय व्यवसायिक तसेच इतर आरोग्य सेवा व्यावसायिकांची Health Professional Registry (HPR) मध्ये आणि आरोग्य सेवा संस्थांची Health Facility Registry (HFR) मध्ये नोंदणी करण्यासाठी डिजिटल प्रणाली उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

परिषदेच्या निदर्शनास आले आहे की, सद्यस्थितीत ABDM च्या HPR पोर्टलवर "Acupuncture Practitioner" साठी स्वतंत्र नोंदणी विकल्प उपलब्ध नाही. त्यामुळे महाराष्ट्र ॲक्यूपंक्चर परिषदेकडे नोंदणीकृत असलेल्या अक्यूपंक्चर व्यवसायिकांना योग्य व्यावसायिक प्रवर्गामध्ये HPR नोंदणी पूर्ण करताना अडचणी निर्माण होत आहेत.

या संदर्भातील बाब महाराष्ट्र ॲक्यूपंक्चर परिषदेने संबंधित शासन प्राधिकरणांच्या निदर्शनास आणून दिली असून, योग्य त्या स्तरावर आवश्यक पाठपुरावा करण्यात येत आहे. HPR पोर्टलमध्ये महाराष्ट्र अक्यूपंक्चर परिषदेकडे नोंदणीकृत ॲक्यूपंक्चर व्यवसायिकांसाठी योग्य नोंदणी विकल्प उपलब्ध करून देण्याची मागणी परिषदेमार्फत करण्यात आलेली आहे.

परिषदेने विशेषतः "Acupuncture Practitioner" करिता विकल्प HPR पोर्टलवर उपलब्ध करून देण्याची विनंती केली आहे, जेणेकरून महाराष्ट्र ॲक्यूपंक्चर परिषदेकडे वैधरीत्या नोंदणीकृत असलेल्या सर्व ॲक्यूपंक्चर व्यवसायिकांना योग्य प्रवर्गातून HPR नोंदणी करता येईल.

**नोंदणीकृत ॲक्यूपंक्चर व्यवसायिकांसाठी महत्त्वाच्या सूचना-**

१. महाराष्ट्र ॲक्यूपंक्चर परिषदेकडे वैध नोंदणी असलेल्या कोणत्याही व्यवसायिकाने ॲक्यूपंक्चर व्यवसायिकांसाठी स्वतंत्र विकल्प उपलब्ध नसल्यामुळे चुकीच्या, असंबंधित किंवा अयोग्य व्यावसायिक प्रवर्गातून HPR वर नोंदणी करू नये.

२. HPR पोर्टलवर "Acupuncture Practitioner" यासाठी योग्य विकल्प उपलब्ध झाल्यानंतर, HPR नोंदणीची कार्यपद्धती व आवश्यक मार्गदर्शन याबाबत परिषदेमार्फत स्वतंत्र अधिकृत परिपत्रक जारी करण्यात येईल.

३. तोपर्यंत सर्व नोंदणीकृत व्यवसायिकांनी आपले परिषद नोंदणी प्रमाणपत्र, नोंदणी क्रमांक, शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे, आधार कार्ड, पॅन कार्ड तसेच इतर आवश्यक कागदपत्रे अद्ययावत व तयार ठेवावीत.

४. कोणत्याही व्यक्ती, खासगी संस्था, एजन्सी किंवा इतर अनधिकृत स्रोताकडून प्राप्त झालेल्या अनधिकृत संदेश, सूचना किंवा सल्ल्यानुसार चुकीच्या व्यावसायिक प्रवर्गातून HPR नोंदणी करण्याची कार्यवाही करू नये.

५. HPR नोंदणीसंदर्भात भारत सरकार किंवा ABDM प्राधिकरणाकडून प्राप्त होणाऱ्या पुढील सूचना, अद्ययावत माहिती अथवा निर्णयाची माहिती महाराष्ट्र ॲक्यूपंक्चर परिषदेच्या अधिकृत परिपत्रक/सूचनेद्वारे सर्व नोंदणीकृत व्यवसायिकांना देण्यात येईल.

महाराष्ट्र ॲक्यूपंक्चर परिषद ही नोंदणीकृत ॲक्यूपंक्चर व्यवसायिकांचा राष्ट्रीय डिजिटल आरोग्य व्यवस्थेमध्ये योग्य व अधिकृत समावेश सुनिश्चित करण्यासाठी तसेच त्यांच्या व्यावसायिक हितांचे संरक्षण करण्यासाठी संबंधित शासन प्राधिकरणांकडे आवश्यक पाठपुरावा करीत आहे.

त्यामुळे सर्व नोंदणीकृत ॲक्यूपंक्चर व्यवसायिकांनी सदर परिपत्रकाची नोंद घ्यावी

(नारायण डी. नवले)
प्रबंधक
महाराष्ट्र ॲक्यूपंक्चर परिषद
मुंबई